# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./आयसीडी/२०२२-२३/२८५

क्र.२/२०२२-२३ गोपनीय

व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२२-२३ मधील १६ जानेवारी, २०२३ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा सोमवार, दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता आंबडेकर भवन, कालिना परिसर येथे आयोजित करण्यात आली.

सदर बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते.

| अनु. क्र. | मा. सदस्याचे नाव | पदनाम | उपस्थिती / अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. दिगंबर शिर्के (प्रभारी कुलगुरू) | अध्यक्ष | उपस्थित |
| २. | प्रा. अजय भामरे (प्रभारी प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३. | डॉ. कविता लघाटे | सदस्य | उपस्थित |
| ४. | डॉ. अनिल कुमार सिंग | सदस्य | अनुपस्थित |
| ५. | प्रा. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ६. | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ७. | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ८. | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ९. | प्रा. सुनील भिरूड (प्रभारी कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १०. | प्रा. (सीए) प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित | उपस्थित |
| ११. | डॉ. प्रसाद कारंडे (प्रभारी संचालक, प.व मु मं) | निमंत्रित | उपस्थित |

**अनुपस्थिती :-**

डॉ. अनिल कुमार सिंग यांनी त्यांची अनुपस्थिती कळविली असल्याने त्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

श्रद्धांजली

**राजा बापट**

जेष्ठ लेखक, नाटककार रत्नाकर मतकरी यांच्या बालनाट्य संस्थेतून बालकलाकार म्हणून रंगभूमीवर पाऊल टाकणारे ज्येष्ठ अभिनेते राजा बापट यांचे दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते.

**एडसन अरांतेस दो नासिमेंतो उर्फ पेले**

फुटबॉल इतिहासातील सर्वकालीन महानतम खेळाडू पैकी एक, ब्राझीलला तीन विश्वचषक जिंकवून देणारे विक्रमवीर आघाडीपटू पेले यांचे दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी कर्करोगामुळे निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते.

**हिराबेन मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्री हिराबेन मोदी यांचे वृद्धापकाळाने दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९५ वर्षांच्या होत्या.

**केशवराव धोंडगे**

शेकापचे जेष्ठ नेते केशवराव धोंडगे यांचे वृद्धापकाळाने दिनांक ०१ जानेवारी, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते १०२ वर्षांचे होते.

**सुधीर नांदगावकर**

प्रभात चित्र मंडळाचे संस्थापक सदस्य व जेष्ठ चित्रपट समीक्षक सुधीर नांदगावकर यांचे प्रदीर्घ आजाराने दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

**केसरीनाथ त्रिपाठी**

पश्चिम बंगाल, बिहार आणि इतर दोन राज्यांचे माजी राज्यपाल केसरीनाथ त्रिपाठी यांचे अल्पशा आजाराने दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ८८ वर्षांचे होते.

**डॉ. विश्वास मेहेंदळे**

आकाशवाणी दिल्ली केंद्राचे आणि दूरदर्शनचे पहिले वृत्तनिवेदक डॉ. विश्वास मेहेंदळे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

**डॉ. विश्वनाथ लक्ष्मण देशपांडे**

ज्येष्ठ गणित तज्ञ डॉ. विश्वनाथ लक्ष्मण देशपांडे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षाचे होते.

**चित्रा नवाथे**

ज्येष्ठ अभिनेत्री चित्रा नवाथे यांचे अल्पशा आजाराने दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८९ वर्षाच्या होत्या.

**सुनील होळकर**

अभिनेता सुनील होळकर यांचे दुर्धर आजाराने दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ४० वर्षाचे होते.

माननीय सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेचीबाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १. | **दिनांक २१ डिसेंबर, २०२२ चे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.** | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. २. | **जनसंपर्क अधिकारी, विद्यापीठ उपपरिसर (ठाणे, रत्नागिरी, पालघर व सिंधुदुर्ग) या पदावरील नियुक्तीबाबत.** | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | उपरोक्त पदांबाबत असा ठराव मंजूर करण्यात आला की, ही पदे एका वर्षा करीता देण्यात येईल आणि नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. या पदा करिता प्रतिमाह रु.३५,०००/- ( पस्तीस हजार मात्र)प्रमाणे मानधन, तसेच दर तीन महिन्यानी त्यांच्या कामाचा आढावा घेऊन तसा अहवाल मा. कुलगुरूंकडे सादर करावा. तसेच जर अहवाल समाधान कारक असेल तर त्यांना पुढील एका वर्षाकरिता मुदत वाढ देतायेईल. तसेच असाही ठराव मंजूर करण्यात आला की, उपरोक्त सदरहू अधिकारी यांना दोन वर्षापेक्षा जास्त पुनः नियुक्ती देता येणार नाही. त्यानंतर भरती प्रक्रिया नव्याने राबवून नवीन लोकांची तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात यावी.सदर भरती प्रक्रियेसाठी खालील समिती निर्णय घेईल.<br>१) प्र- कुलगुरु., २) संबंधित अधिष्ठाता ,३) कुलसचिव. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ३. | **विद्यापीठातील तांत्रिक संवर्गातील डाटा एंट्री ऑपरेटर या पदावर सेवेची १२ वर्ष पूर्ण झाल्यानंतर अपग्रेडेशन करण्याबाबत.** | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | विद्यापीठातील तांत्रिक संवर्गातील डाटा एंट्री ऑपरेटर या पदावर सेवेची १२ वर्ष पूर्ण झाल्यानंतर अपग्रेडेशन करण्याबाबततत्वतः मान्यता देण्यात आली. परंतु उपरोक्त कर्मचाऱ्याना व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी ठरवलेली कर्तव्ये, जबाबदाऱ्या पाळणे बंधनकारक असेल. तसेच ॲड नील हेळेकर समितीच्या अंतिम अहवालातील मुद्दा क्रमांक सात मधील अटी क्रमांक १,२,३,४,५,७ व ९वगळून इतर सर्व मुद्दे ग्राहय धरण्याचा निर्णय घेण्यात आला. | |
| बाब क्र. ४. | **विद्यापीठातील कनिष्ठ लघुलेखक या पदावर तात्पुरती नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्याच्या संदर्भात निर्णय घेण्याबाबत.** | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | उपरोक्त बाबीवर चर्चा करण्यात आली व कनिष्ठ लिपिक /लिपिक या पदावरून कनिष्ठ लघुलेखक या पदावर पदोन्नती नाकारण्यात आली. | |
| बाब क्र. ५. | **विद्यापीठातील तांत्रिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या तात्पुरत्या / सलग पदोन्नत्या / नियुक्ती संदर्भात निर्णय घेण्याबाबत.** | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | असा ठराव पारीत करण्यात आला की,विद्यापीठातील तांत्रिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या तात्पुरत्या / सलग पदोन्नत्या / नियुक्ती संदर्भात तत्वतः मान्यता देण्यात आली. परंतु संबंधित कर्मचाऱ्यांना पदाप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील. तसेच ॲड नील हेळेकर समितीच्या अंतिम अहवालातील मुद्दा क्रमांक सात मधील अटी क्रमांक १,२,३,५, व ९ वगळून इतर सर्व मुद्दे ग्राहय धरण्याचा निर्णय घेण्यात आला. | |
| बाब क्र. ६. | **मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ यांच्या दिनांक ६ जानेवारी, २०२३ व मुंबई विद्यापीठ मुद्रणालय यांचे दिनांक २८ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रातील मागणीनुसार.** | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | उपरोक्त बाबीवर असा ठराव पारित करण्यात आला की, शासनाच्या मुंबई विद्यापीठाच्या मुद्रणालयाच्या सातव्या वेतन आयोगात समाविष्ट असलेल्या पदांना पदोन्नती देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली. तथापि जी पदे सातव्या वेतन आयोगाच्या पदसाखळीत नाहीत अशी पदे विद्यापीठ मुद्रणालयाच्या साखळी (Promotion Channel )मध्ये समाविष्ट करून पुढील व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात यावी. तसेच ॲड नील हेळेकर समितीच्या अंतिम अहवालातील मुद्दा क्रमांक सात मधील अटी क्र. १,२,३,४,५,६,७,८ व ९ वगळून इतर सर्व मुद्दे ग्राहय धरण्याचा निर्णय घेण्यात आला. | |

SKS

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ७. | **पीपल्स एज्यकेशन सोसायटीच्या व्यवस्थापन मंडळामध्ये अंतर्गत मतभेद असल्यामुळे संचालित सर्व महाविद्यलयांचे, वेतन विद्यार्थी शिष्यवृती व दैनंदीन प्रशासन सुरळीत चालण्याबाबत सेवानिवृत्त न्यायाधीश विधी सल्ला प्राप्त होणेबाबत.** | महाविद्यालय शिक्षक मान्यता कक्ष |
| ठराव | उपरोक्त बाबीवर चर्चेअंती ठराव पारित करण्यात आला की, सदर बाबतीत मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री. एम. जी. गायकवाड यांचे कडून विधी सल्ला घेण्यात यावा. तसेच त्यांनी सदरहू महाविद्यालयाच्या संस्थेवरील हक्क सांगणाऱ्या संबंधित व्यक्ती / संघटना सोबत चर्चा करून त्याबाबतचा सल्ला घेण्यात यावा. | |
| बाब क्र. ८. | **शासन निर्णयानुसार महागाई भत्ता सुरु करण्यासाठी व महागाई भत्त्याची थकबाकी अदा करण्यास व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर.** | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | शासन निर्णयानुसार महागाई भत्ता सुरु करण्यासाठी व महागाई भत्त्याची थकबाकी अदा करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. | |
| बाब क्र. ९. | **डॉ. विश्वंभर व्ही. जाधव यांनी केलेल्या विनंती नुसार आपल्या पत्नीच्या वैद्यकीय उपचारासाठी मागितलेली रक्कम रुपये ५,००,०००/- (पाच लाख रुपये) हि विद्यापीठाच्या कोणत्या फंडातून देण्यात यावी व वळती करून घेताना त्यावर व्याजाचा दर किती आकारावा. सदर बाब पुढील कार्यवाही करिता व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेकरिता सादर करण्यात येत आहे.** | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | डॉ. विश्वंभर व्ही. जाधव यांनी केलेल्या विनंती नुसार त्यांच्या पत्नीच्या वैद्यकीय उपचारासाठी व्यवस्थापन परिषदेने विशेष बाब म्हणून रुपये २,००,०००/- (दोन लाख रुपये) देण्यास मान्यता दिली. तसेच यापुढे महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांकः वैखप्र-2019/प्र.क्र.236/राकातव-2 , दिनांक २७ मार्च २०२० प्रमाणे कार्यवाही करावी, असा ठराव मंजूर करण्यात आला. | |
| बाब क्र. १०. | **विद्यानगरी परिसरातील दोन एकर मोकळ्या जागेवर शारीरिक शिक्षण विभाग व टाटा यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई मॅरेथॉन २०२३चे आयोजन झाले होते. सदर आयोजनास कार्योत्तर मंजुरीसाठी बाब.** | विद्यानगरी प्रशासकीय विभाग |
| ठराव | विद्यानगरी परिसरातील दोन एकर मोकळ्या जागेवर शारीरिक शिक्षण विभाग व टाटा यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई मॅरेथॉन २०२३ चे आयोजन करण्यात आले. सदरहू आयोजन हे मुंबई विद्यापीठाच्या विभागामार्फत असल्यामुळे सदर कार्यक्रमास दहा दिवसासाठी तीस हजार रुपये प्रतिदिन अधिक जी.एस.टी. भरण्याच्या अटीवर व्यवस्थापन परिषदेने परवानगी दिली. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ११. | **विद्यानगरी परिसरातील उत्तर व्दार लगतची जागा नाममात्र दराने गृह विभागाच्या पोलीस शिपाई भरती प्रक्रिया - २०२१ करिता पोलीस विभागास उपलब्ध करून देण्याकरिता सामंजस्य करार करणेबाबत.** | विद्यानगरी व ~~फोर्ट~~ प्रशासकीय विभाग |
| ठराव | महाराष्ट्र शासन, गृह विभागाने प्रस्तावित केलेल्या बाबीस व्यवस्थापन परिषदेने कार्योत्तर मंजुरी दिली. तसेच विद्यापीठातील खुल्या जागा,मैदाने, हॉल, कॉन्फरन्स रूम इत्यादी संदर्भात वेळोवेळी मागणी होत असते. त्यासंदर्भात एकसमानता आणण्यासाठी व सदरहू मालमत्तेचे भाडे ठरविण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात यावी असे ठरले. तसेच सदर समिती ही त्यासंबंधीचे नियम तयार करेल. सदर भाडेवाढ हि दरवर्षी सुधारित करून, त्याबाबत वेळोवेळी संबंधित विभागाने परिपत्रक काढावे, असा ठराव मंजूर करण्यात आला.<br>तसेच, या संदर्भात यापूर्वी गठीत समितीचे इतिवृत्त व अहवाल या नवीन समितीच्या निर्देशनास आणावा. सदर समितीने त्यांचा अहवाल तीन महिन्यात सादर करावा. नविन समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले. | |

| समिती | |
|---|---|
| १. | Prof Kavita Laghate |
| २. | Registrar |
| ३. | F.A.O. |
| ४. | Prin. A. K. Singh (Dean Interdisciplinary) |
| ५. | Prin. Suresh Ukrande. |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. १२. | **Approve the Minutes of Building and Works Committee dated 16th January 2023.** | Infrastructure Planning, Execution and Maintenance department. |
| ठराव | The Minutes of Building and Works Committee dated 16th January 2023 are approved by Management Council . | |

| आयत्यावेळी आलेली बाब | | |
|---|---|---|
| बाब क्र. १३ | **मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघटनाच्या विविध मागण्या संदर्भात** | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघटनाच्या विविध मागण्या संदर्भात असा निर्णय घेण्यात आला की त्यांना फॉर्म- १६, पे-स्लीप व आय-डी कार्ड देण्यात यावे. तसेच पाळणाघराची व्यवस्था करण्याबद्दल निर्णय घेण्यात आला. तसेच उर्वरित मागण्यासंदर्भात विधी सल्ला घेण्याचे ठरले. ह्या विधी सल्लासाठी अ‍ॅड युवराज नरवणकर किंवा अ‍ॅड विक्रम वालावलकर ह्यांची विद्यापीठाच्या विधी पॅनलवर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली व त्यापैकी जे उपल्बध असतील त्यांच्याकडून कायदेशीर सल्ला घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, असे ठरले. | |
| बाब क्र. १४ | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ६२ नुसार विविध प्राधिकरण तसेच अभ्यासमंडळ (उदा. प्राचार्य, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक, विभाग प्रमुख, मान्यताप्राप्त महाविद्यालयांच्या/ संस्थांच्या व्यवस्थापनाचे प्रतिनिधी) यांच्या नावाची मतदार नोंदवहीत नाव नोंदविण्याकरीता प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी समितीच्या सदस्यांची नावे सुचविण्याकरिता बाब सादर.** | निवडणूक विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठातील विविध प्राधिकरण तसेच अभ्यासमंडळ करीता प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करण्यासाठी खालील सदस्यांची समिती नेमण्यात आली.<br>१) डॉ. संजय जगताप ( माजी सहसंचालक )<br>२) श्री. विकास डावरे ( उपकुलसचिव )<br>३) सौ. वैशाली कांबळे ( सहायक कुलसचिव )<br>तसेच उपरोक्त समितीस लागणारे मनुष्यबळ हे मानव संसाधन विकास कक्ष हे उपलब्ध करून देईल, आणि संगणक उपकरणे हे यु.सी.सी. उपलब्ध करून देईल. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

Sd/-
उपकुलसचिव

कुलसचिव (प्र.)

प्र- कुलगुरू (प्र.)

इतिवृत्त मंजुर

मा. कुलगुरू (प्र.)

Gmail Executive Authorities Unit . <eau120@fort.mu.ac.in>

## ore Committee Report

message

Registrar <registrar@fort.mu.ac.in> Wed, Dec 21, 2022 at 2:52 PM
To: Executive Authorities Unit <eau120@fort.mu.ac.in>

Dear Madam,

Attached Core Committee Report approved by MC
Take this on record and issue the points accordingly to concern sections on priority today.

Thanks and regards

**Prof. Sunil Bhirud**
**I/c. Registrar,**
**University of Mumbai**
**Fort MUMBAI 400032**
**Ph. office . 022 68320000 Ext. 706**

**Core Committee Report.docx**
26K

Management Council Core Committee Report

Considering the long pending demands of the non-teaching employees of the University and their Unions, Management Council decided to constitute the present Core Committee.

The Core Committee met the non-teaching employees and their respective Union representatives personally on various occasions from time to time till their satisfaction. The Core Committee not discussed with the concerned employees but also collected their papers to study and understand the problems.

After detailed discussions with the employees and their union representatives, the respected members of the Core Committee met the University Authorities and Vice Chancellor and Pro-Vice Chancellor and discussed with them at length.

After detailed discussion and in-depth study of the various demands of the non-teaching employees of the University, the Core Committee notes following observations.

1. Most of the demands are in process.
2. Whatever legally possible, the University Departments have already expeditiously completed the documentations and correspondence with the State Government.
3. Some demands are not justified and therefore can't be accepted.
4. Some demands are sub-judice before the Honourable High Court and therefore can't be interfere.
5. Some demands are in respect of the policy decisions of the University. The Core Committee discussed and forwarded the said issues to the Management Council. Considering the interest of the University, appropriate decisions have already taken in the Management Council.

The demands of the two unions and the recommendations of the core committee are as under :

1. The payment of all the retirement benefits to all the employees retired after 2015.

The Committee has verified the documents and it is clear that the roaster is about to complete and finalised, which will help the office of the Joint Director to release the retired benefits to the employees. The Committee therefore strongly recommend the concern department to complete the work of verification of roaster on war footing.

2. Interest on the delayed payment of provident fund.

The Committee has verified the documents and records. The Provident fund authority is Government Authority and delay (if any) is because of the administrative reasons. Therefore, Committee rejects the demand.

3. Release of pension to all the retired employees as per Government norms.

The Committee has verified the documents and records and finance department has clarified that the pension papers of all the retired employees have already submitted for verification to the office of Joint Registrar. Therefore, the said demand has become infructuous.

4. Publication of roaster and seniority list.

The department has already published the seniority list and therefore there is no need to deal with this demand.

5. Gold ring to the retired employee after 2020.

The Committee strongly oppose such practice. There was no such practice in any of the Government departments and establishments. Even otherwise, the Management Council has already decided to stop this practice in its earlier meetings and therefore Committee rejects this demand.

6. Appointments of all the pending posts on compassionate ground after 2015.

The Establishment Department and Finance Department has submitted jointly that the process to fill up the said post of compassionate grounds have already started and will be completed soon. Therefore, Committee doesn't recommend

the said demand. Even otherwise, the compassionate appointment is not a matter of right to any of employees.

7. Upgradation on the technical posts.

The Core Committee has decided to recommend strongly to consider the demand of the University employees about the promotion on technical posts by giving one day break.

The other category of employees in the technical cadre is promotion from DATA entry operator to SYSTEM operator and from SYSTEM operator to MANAGER. Such promotion is already given to 25 employees and only 12 employees are remaining. The committee therefore recommends this promotion as the one time measure.

The said demands shall be considered only on following conditions.

1. The committee also strongly recommends that the said promotion is with prospective effect from the date of the resolution of the Management Council. .

2. The said promotion shall be subject to initial period of probation of six months.

3. During this period of probation of six months, the employees shall have the necessary qualification of MCA OR EQUIVALENT education qualification and shall able to perform their duties independently with respect to various projects assigned to them.

4. The work of these promoted employees shall be analysed and evaluated by the appraisal committee of technical experts and the appraisal report shall be submitted to the Registrar of the University. If the report of appraisal committee is negative, the said employee shall be demoted to his original post with immediate effect.

5. The department shall take appropriate action against the concern employee by giving him the opportunity of hearing.

6. This will apply only to the present last batch of employees only and can't be read as the precedence.

7. The artificial and technical break of 1 day shall be treated as condoned only for the purpose of calculation of retirement benefits as the case may be and can't be treated for purpose of seniority.

8. This will be only one time recommendation and there will not be any further promotions.

9. The concerned employees must be qualified for the post and shall undergo interview process for the same.

10. The concerned representatives of both the unions shall give written undertaking that they and their members shall co-operate the University authorities to enhance the academic atmosphere of the University.

11. The concerned representatives of both the unions shall give written undertaking that they and their members shall co-operate the University authorities to maintain discipline and link their pay to biometric attendance.

12. The concerned representatives of both the unions shall give written undertaking that they and their members shall co-operate the University authorities to complete the work audit and system of self-appraisal system.

8. Special allowance to all the security guards for working for six days.

The Committee has verified the documents and records and interacted with the concerned security officer. However, there is no justified reasons given to allow the said demand. The security guards are already getting compensatory off and other benefits and therefore this demand is not justified and is rejected. The Committee has also observed that the pay scale of the temporary guards is also increased in the recent past.

9. Disposal of the pending issues regarding the Vice Chancellor fund.

The Committee has carefully observed that the Honourable Vice-Chancellor has already taken steps to expediate the process to resolve all the pending matters and issues regarding this particular demand. Therefore, now this demand has become infructuous.

The other issue is regarding the medical claims of some of the employees, who lost their track of policy and did not get policy renewed within time. Such claim shall be scrutinised independently and settled as one time measure.

10. Demand of Uniform, rain coats, sweater and sarees.

During the course of discussion and negotiations, this demand has already granted by the Management Council and therefore has become infructuous.

11. Disposal of pending applications of home loan.

The Committee has verified the documents and records and finance department is conducting counselling sessions with the concerned employees and guiding them the proper and lowest rate of interest home loan scheme from different government and private agencies. The rate of interest of the University is much higher and therefore not advisable to be recommended to our employees. The committee also observed the amount outstanding from the long pending home loans. The committee recommends the finance department to initiate action against such outstanding loans immediately.

The committee also observed and recommends that if the employees are interested to avail the home loan from the University, the same shall be considered sympathetically. The committee requests the finance department to form the new guidelines for the purpose of disbursement of the loan to the employees.

12. Promotion of class IV employees on the vacant posts of class III.

Considering the long-standing demand with the State Government to fill up the said vacant posts, the committee recommends to initiate and complete the representation with the State Government.

13. Initiation of (DCPS) numbers of the direct appointed employees in the year 2011 and 2013.

The Committee has verified the documents and records and Finance department has assured that the said process is completed and therefore the said demand has become infructuous.

14. The recovery process and transfer of employees with vengeance.

The Committee has verified the documents and records and after careful scrutiny, they did not find any single case of vengeance and therefore the said demand is rejected.

15. The file of Sunil Hate is pending for signature of Hon. Vice Chancellor.

The Committee has verified the documents and records and the said file already processed and submitted to the office of the joint director. The department is removing all the office objections of the auditor.

16. The promotion to Mr. S.T.More and others.

The Committee has verified the documents and records and after careful consideration of the papers, it is revealed that the said promotion can't be granted in view of the Government Resolution dated 7.05.2021. The Committee also observed that Mr. S.T.More has already received the difference of pay scale from the University fund. Therefore, this demand is rejected.

17. Retirement benefits and pension to Mr. Anand Kolge.

The Committee has verified the documents and records and finance department has confirmed that Mr. Kolge has already received the said benefits. Therefore, the said demand has become infructuous.

18. Promotion of Avinash Tambe and Sanjay Ghate on the post of direct recruits.

The core committee has also decided to give one more hearing to Mr. Tambe regarding his grievance about promotion.

The Hon. Vice Chancellor along with Pro Vice Chancellor and Registrar also decided to give hearing to Mr. Tambe and his union representatives. Accordingly, all the union office bearers met the University Authorities on 5.08.2022 at 12.15 pm. At Kalina Campus.

The Union representatives made their grievance that as per the DPC conducted on 27.01.2016, there were total 38 sanctioned posts. Out of which, 19 were to be filled by direct recruitments and 19 to be filled by promotion. The Union representatives also admitted that the posts of promotions were filled up properly by the University including the reservation quota.

The demand of Mr. Tambe and his union representatives is that he shall be promoted with retrospective effect on the posts to be filled by direct recruitment. The union representatives also gave names of the open category employees who are allegedly promoted and absorbed on the posts of direct recruits.

On verification, it is found that the said employees were promoted on 10.01.2010 when the total sanctioned posts were 61 and the State Government reduced the said sanctioned posts from 61 to 38. Therefore, all these employees were continued on their posts but didn't absorb them on the posts of direct recruits. The union representatives failed to produce any documentary proof to justify their allegations. Therefore, the Committee rejects the said demand.

19. Retirement benefits to be paid to Mr. Ashok Waghmare.

The Committee has verified the documents and records and found that the said benefits already paid Rs. 2,63,938/- on 17.01.2020.

20. Absorption in service of Mr. Atul Barapatre.

The Committee has verified the documents and records and it is found that the initial appointment of Barapatre is seasonal basis and therefore the said G.R. is not applicable to him. The said issue is already resolved and rejected vide letter dated 1.02.2022.

21. Appointment of Mr. Ramesh Bania on the post of Head Clerk with retrospective effect.

The Committee has verified the documents and records and it is noted that the said post is not vacant and therefore this demand is rejected.

22. Appointment of Ms. Bhagyashri Pratap Gaikwad on compassionate post.

The file of Pratap Gaikwad could not be submitted to the office of the joint director for want of roaster and therefore the said demand can't be considered.

23. Appointment of Ms. Kavita Sudesh Pawar on compassionate post.

The Committee has verified the documents and records and Ms. Kavit Sudesh Pawar is not entitle for the said post of compassionate appointment as per clause 10 of the G.R. dated 21.09.2017.

24. Additional benefits to be paid to the DATA entry operators after completion of 12 years of service.

The Committee has verified the documents and records and suggested additional pay band to the skilled employees of computer section. The separate committee has already recommended and M.C. has accepted the pay hike of all such employees.

25. Continuation of retired temporary employees on different pay scale on contract basis.

The Committee has verified the documents and records and as the entire dispute is pending before Honourable Supreme Court, such issue can't be discussed in the core committee.

The Core Committee express their gratitude to the concerned employees and their respective Union Representatives and University Authorities for their cooperation to the Core Committee.

It is therefore directed to the Registrar to find out the present position of direct recruits and whether the University can fill up the said posts of direct recruits by following due process of law.

गंभीर आजारांमध्ये अवयव प्रतिरोपण व काही नवीन आजारांचा समावेश करुन सदर आजारांवरील औषधोपचाराकरिता <u>अग्रीम मंजूर करणेबाबत ...</u>

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वैखप्र-२०१९/प्र.क्र.२३६/राकावि-२**
१० वा मजला, गोकूळदास तेजपाल रुग्णालय आवार,
नवीन इमारत मंत्रालय, मुंबई.
दिनांक : २७ मार्च, २०२०.

**वाचा -**

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक-एमएजी-१०८४/४१५७/सीआर-१५६, दिनांक २९ एप्रिल, १९८५.
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक-एमएजी-१०८८/३८३७/आरोग्य-९, दिनांक २३ जानेवारी,१९८९.
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक-एमएजी-१०९९/प्र.क्र.४०/आरोग्य-३, दिनांक २९ जुलै, १९९९.
४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक-एमएजी-१०९९/प्र.क्र.२३८/आरोग्य-३, दिनांक २१ ऑगस्ट, १९९९.
५) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक-एमएजी-१०९५/सीआर-४५/आरोग्य-३, दिनांक ४ जुलै, २०००.
६) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक -एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३, दिनांक १९ मार्च, २००५.
७) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी-२००५/प्र.क्र.२५१/आरोग्य-३, दिनांक १० फेब्रुवारी, २००६.

**प्रस्तावना -**

संदर्भाधिन क्र.५ येथे नमुद करण्यात आलेल्या दिनांक ०४.०७.२००० च्या शासन निर्णयान्वये पुढील पाच आजार गंभीर आजार म्हणून अंतर्भूत आहेत :- १)हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे २)हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया ३)अॅन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया ४)मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया ५)रक्ताचा कर्करोग. सदर शासन निर्णयात दिनांक १० फेब्रुवारी, २००६ च्या शासन निर्णयान्वये गंभीर आजारांच्या यादीतील अनुक्रमांक ५ येथील "रक्ताचा कर्करोग" याऐवजी "कर्करोग" चा अंतर्भाव करण्यात आला आहे. तसेच, सदर शासन निर्णयान्वये या पाच गंभीर आजारांवरील शासकीय अथव शासनमान्य खाजगी रुग्णालयातील औषधोपचार व आवश्यक उपकरणांची खरेदी करण्यासाठ येणारा संभाव्य खर्च विचारात घेऊन अग्रीमाची मर्यादा रु.१,५०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार फक्त) एवढी करण्यात आली आहे. आरोग्य सुविधांमध्ये अत्याधुनिक उपचार उपलब्ध असल्याची बाब लक्षात घेता, संबंधित आजाराशी तज्ञांचे मत तसेच केंद्र शासनाच्या सीजीएचए

…तर्गत असलेल्या तरतूदी यांचा विचार करुन काही नवीन गंभीर आजार/उपचार यांचा …कीय खर्च प्रतिपूर्तीच्या प्रयोजनार्थ तसेच त्यासाठी अग्रिम मंजूर करण्याची बाब यांच्या अनुषंगाने …ण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## …शासन निर्णय-

सदर शासन निर्णयान्वये संदर्भाधीन क्र.६ च्या शा.नि अन्वये विर्निदिष्ट करण्यात आलेल्या गंभीर आजार/उपचारांमध्ये खालील तक्त्यात नमूद आजार/उपचार यांचा अंतर्भाव करण्यात येत आहे.

| अ. क्र. | वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीकरीता नव्याने अंतर्भूत करण्यात आलेले गंभीर आजार/उपचार | वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीची प्रत्यक्ष खर्च किंवा जास्तीत जास्त कमाल मर्यादा (पॅकेज अंतर्गत) |
|---|---|---|
| १ | यकृत प्रतिरोपण (Liver Transplant)<br>(Live Donor वरील शस्त्रक्रिया असल्यास त्यासाठी रु.२.५० लाख च्या मर्यादेत) | रु.१५ लाख फक्त<br>(+ रु.२.५० लाख) |
| २ | हृदय प्रतिरोपण (Heart Transplant) | रु.१५ लाख फक्त |
| ३ | फुफ्फुस प्रतिरोपण (Lung Transplant) | रु.१५ लाख फक्त |
| ४ | अस्थिमज्जा प्रतिरोपण (Bone Marrow Transplant) | रु.८ लाख फक्त |
| ५ | कर्णावर्त प्रतिरोपण (Cochlear Transplant) | रु.६ लाख फक्त |
| ६ | हृदय व फुफ्फुस प्रतिरोपण (एकत्र) (Heart & Lung Transplant (Together) ) | रु.२० लाख फक्त |

२. उपरोक्त नमूद तक्त्यातील आजारांसाठी आंतररुग्ण म्हणून शासकीय तसेच खाजगी रुग्णालयात झालेला प्रत्यक्ष खर्च अथवा आजारासमोर नमूद करण्यात आलेली कमाल मर्यादेत (celling limit) यापैकी जी रक्कम कमी असेल ती अनुज्ञेय करण्यात यावी. कमाल मर्यादेपेक्षा जास्त झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती कोणत्याही परिस्थितीत करण्यात येऊ नये. वास्तव्यावरील खर्चाची परिगणना करताना शासन निर्णय दिनांक १९ मार्च, २००५ मधील तक्त्याप्रमाणे करावी व ना-देय बाबी (उदा. कंझुमेअबल, अल्कोहोलीक, टॉनिक, खाद्यपदार्थ इत्यादी) वगळाव्यात.

३. अवयव प्रतिरोपण शस्त्रक्रिया ही पूर्वनियोजित शस्त्रक्रिया असून त्यासाठी उपचार हे ज्या रुग्णालयांना मानवी अवयव प्रतिरोपण १९९४ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे अशा रुग्णालयात उपचार घेण्यात यावेत. तसेच प्रत्यक्ष उपचार चालू करण्यापूर्वी ज्या तज्ञ डॉक्टरांकडून उपचार घ्यावयाचे आहेत त्यांच्याकडून उपचारानंतर रुग्ण बरा होण्याची शक्यता (treatment prognosis), संभाव्य गुंतागुंत (complications) याबाबत प्रमाणपत्र उपचारापुर्वी प्राप्त करुन घ्यावे.

४. उपरोक्त तत्क्यात नवीन अंतर्भूत केलेल्या गंभीर आजारासाठी / उपचारासाठी जी वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीस मर्यादा निश्चित केली आहे त्या मर्यादेच्या जास्तीत जास्त २५ (पंचवीस) टक्के एवढे वैद्यकीय अग्रीम प्रकरणनिहाय मंजूर करण्यात यावे.

५. प्राधिकृत वैद्यकीय अधिका-याने वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीचे देयके तपासून आजार प्रमाणीत करताना तो या शासन निर्णयान्वये कोणत्या आजारामध्ये मोडतो हे सदर आजाराच्या नावासह स्पष्ट नमूद करावे

६. अग्रीम मंजुर करण्याबाबतचे सर्वसाधारण नियम सोबतच्या परिशिष्ट "अ" प्रमाणेच राहतील.

७. हे आदेश सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू राहतील.

८. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक.०२/सेवा-५, दिनांक ०७ जानेवारी, २०२० नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००६१८१२५९१६६०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra R Gadhari

Digitally signed by Ravindra R Gadhari
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9668226de60c3cc5b8ccd56833c07d32831e4140f3de291d1f40d510d295643f, serialNumber=8f564edcac5a4c4a79542e69f18152eb1ab86474731f4ac3d8424b8b56a653e1, cn=Ravindra R Gadhari
Date: 2020.07.27 13:48:50 +05'30'

र.र.गढरी
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
२) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,(सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई,
३) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
४) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव/सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
५) मुख्यमंत्र्याचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
७) मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८) राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१०) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
११) सेंटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लफ लँड रेकॉर्डस, पुणे,